यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा
ज्ञानगंगोत्री परिसर, गंगापूर धरणाजवळ, नाशिक ४२२ २२२
दूरध्वनी क्र .(०२५३) २२३१४७५, फॅक्स क्र.२२३१४७५



जा.क्र.: यचमम्वि/मसा/मान्य/2018

# मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा परिषदेच्या दि.१९ डिसेंबर २०१८ रोजी पार पडलेल्या बैठकीचे इतिवृत्त

मानव्यविद्या व सामाजिशास्त्रे विद्याशाखा परिषदेची सभा बुधवार, दि. १९.१२.२०१८ रोजी आयोजित करण्यात आलेली होती. या सभेस पुढील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

१) डॉ.उमेश राजदेरकर, मा. संचालक, मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा, अध्यक्ष
२) डॉ. सतिष बडवे, निवृत्त प्राध्यापक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद सदस्य
३) डॉ. सुरेश कानडे, सहयोगी प्राध्यापक, हिंदी विभाग, एम.एम.आर.के. महाविद्यालय, नासिक सदस्य
४) डॉ.मधुकर शेवाळे, उपग्रंथपाल, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नासिक सदस्य
५) डॉ.हेमंत राजगुरू, सहयोगी प्राध्यापक, शैक्षणिक सेवा विभाग, सदस्य
६) डॉ.विजया पाटील, सहयोगी प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा, सदस्य
७) प्रा.माधव पळशिकर, सहयोगी प्राध्यापक, संगणकशास्त्र विद्याशाखा, सदस्य
८) डॉ. लतिका अजबानी, सहाय्यक प्राध्यापक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा, सदस्य

पुढील सदस्य त्यांच्या पूर्वनियोजित कार्यक्रमामुळे उपस्थित राहू शकले नाहीत.

९) प्रा. नागार्जून वाडेकर, सहयोगी प्राध्यापक, मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा, सदस्य
१०) डॉ. मोहन काशिकर, प्रमुख, पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर सदस्य
११) डॉ. विनायक देशपांडे, प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर सदस्य

प्रारंभी डॉ. उमेश राजदेरकर यांनी सर्व उपस्थित सदस्यांचे स्वागत केले व बैठकीस प्रारंभ झाला. त्यानंतर विषय पत्रिकेतील प्रत्येक विषयावर सदस्यांनी विस्ताराने चर्चा केली. चर्चेअंती या बैठकीत पुढील निर्णय घेण्यात आले.

**विषय क्र. बी.१/एफ-१७३/२०१८/०१**
मागील दि. २१.०४.२०१७ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

**ठराव क्र. बी.१/एफ-१७३/२०१८/०१**
मागील दि. २१.०४.२०१७ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त वाचून कायम करण्यात आले.

**विषय क्र. बी.१/एफ-१७३/२०१८/०२**
मागील दि. २१.०४.२०१७ रोजीच्या सभेच्या कार्यवृत्तावरील कार्यवाहीचा अहवाल वाचून कायम करणे.

**ठराव क्र. बी.१/एफ-१७३/२०१८/०२**
मागील दि. २१.०४.२०१७ रोजीच्या सभेच्या कार्यवृत्तावरील कार्यवाहीचा अहवाल वाचून कायम करण्यात आला.

मा. कुलगुरु कार्यालय
य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक.
अंतर्गत आवक क्र.: VC/8920

**विषय क्र. बी.१/एफ-१७३/२०१८/०३**

पालिभाषेतील पदवीका स्तरावर अभ्यासक्रम सुरू करण्याविषयी पालिभाषा संशोधन व बहुद्देशीय संस्था नासिक यांच्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**ठराव क्र. बी.१/एफ-१७३/२०१८/०३**

पालिभाषेतील पदवीका स्तरावर अभ्यासक्रम सुरू करण्याविषयी सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यात आला की, विद्यापीठाच्या शिक्षणक्रम संरचनेनुसार सदर शिक्षणक्रमाचा आशय असणे आवश्यक आहे. शिक्षणक्रमातील प्रक्रिया अभ्यासक्रमासाठी पुरेसा व संरचित आशय असणे आवश्यक आहे. तसा आशय असला तरच शिक्षणक्रम सुरू करावा असा निर्णय घेण्यात आला.

**विषय क्र. बी.१/एफ-१७३/२०१८/०४**

बी.लिब.व एम.लिब. शिक्षणक्रमाच्या नविन पाठ्यक्रमास मंजूरी देणे.

**ठराव क्र. बी.१/एफ-१७३/२०१८/०४**

बी.लिब.व एम.लिब. शिक्षणक्रमाच्या प्रस्तावित पाठ्यक्रमावर विस्ताराने चर्चा करण्यात आली. या शिक्षणक्रमाच्या अध्ययन लेखनासाठी ग्रंथालय व माहितीशास्त्राबरोबरच संगणकशास्त्रातील तज्ज्ञांचाही समावेश करावा अशी सूचना करण्यात आली. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अभ्यासक्रम निर्मिती मार्गदर्शक सूत्रांचे तंतोतंत पालन करण्याची सूचना सभासदांनी केली. परिषदेने बी.लिब. व एम.लिब. शिक्षणक्रमाच्या पाठ्यक्रमांना मंजूरी दिली. तसेच या अभ्यासक्रमातील पुस्तकांचे लेखन करण्यासाठी सादर करण्यात आलेल्या प्रस्तावित लेखक व संपादकांच्या नावांच्या यादीलाही मान्यता देण्यात आली.

**विषय क्र. बी.१/एफ-१७३/२०१८/०५**

विद्याशाखेतील विकसन प्रक्रियेत असणाऱ्या शिक्षणक्रमांच्या सद्यस्थितीबद्दल चर्चा करणे.

**ठराव क्र. बी.१/एफ-१७३/२०१८/०५**

विद्याशाखेतील विकसन प्रक्रियेतील एम.ए.शिक्षणक्रमांच्या सद्यस्थितीबद्दल सभेला अवगत करण्यात आले. सदस्यांनी परिपूर्ण आशय व विद्यापीठाच्या गुणवत्ता धोरणाशी सुसंगत असे अध्ययन साहित्य निर्माण करण्यावर भर दिला.

**विषय क्र. बी.१/एफ-१७३/२०१८/०६**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनातर्फे प्रमाणपत्र,पदविका व पदव्युत्तर पदविका शिक्षणक्रम सुरू करण्याच्या प्रस्तावाबाबत निर्णय घेणे.

**ठराव क्र. बी.१/एफ-१७३/२०१८/०६**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनातर्फे प्रमाणपत्र,पदविका व पदव्युत्तर पदविका शिक्षणक्रम सुरू करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

**विषय क्र. बी.१/एफ-१७३/२०१८/०७**

प्रथमवर्ष बी.ए. शिक्षणक्रमाच्या विद्यार्थ्यांत कायदा साक्षरता निर्माण करण्यासाठी ``कायद्याचे सामान्यज्ञान` या विषयात अभ्यासक्रम विकसीत करणेबाबत...

**ठराव क्र. बी.१/एफ-१७३/२०१८/०७**

प्रथमवर्ष बी.ए. शिक्षणक्रमाच्या विद्यार्थ्यांमध्ये कायदा साक्षरता निर्माण करण्यासाठी ``कायद्याचे सामान्यज्ञान` या विषयात अभ्यासक्रम सुरू करण्यास परवानगी देण्यात आली.

**मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणारे विषय :**

**विषय क्र. बी.१/एफ-१७३/२०१८/०८**

इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाने विकसित केलेल्या Certificate Programme in Library and Information Science हा शिक्षणक्रम आपल्या विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्याबाबत.

**ठराव क्र. बी.१/एफ-१७३/२०१८/०८**

इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाने विकसित केलेल्या Certificate Programme in Library and Information Science हा शिक्षणक्रम आपल्या विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना उपलब्ध करून द्यावयाचा आहे. परंतू या शिक्षणक्रमाचे अध्ययन साहित्य इंग्रजी भाषेत असल्याने सदर अध्ययन साहित्याचे मराठी भाषेत भाषांतर करून पुस्तके तयार करण्यास व प्रमाणपत्रपातळीवरील शिक्षणक्रम सुरू करण्यास परवानगी देण्यासंदर्भात प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

सदर प्रस्तावावर सदस्यांनी विस्ताराने चर्चा केली सदर प्रमाणपत्र पातळीवरील शिक्षणक्रम हा विशिष्ट क्षेत्र जसे ग्रंथालयशास्त्र व ग्रंथालयीन काम करणारे सेवक यांना नजरेपुढे ठेऊन विकसित करण्यात आल्याने ह्या शिक्षणक्रमाच्या प्रवेशासाठी किमान १२ वी उत्तीर्ण असणाऱ्या विद्यार्थी, विद्यार्थीनींना प्रवेश देण्यात यावा. तसेच ज्या व्यक्ती गाव व तालुका पातळीवर खाजगी, सार्वजनिक ग्रंथालयात काम करतात अशा विद्यार्थ्यींनी व विद्यार्थ्यांना प्राधान्य द्यावे अशा सूचना सन्माननीय सदस्यांनी केली व सदर विषयास मान्यता देण्यात आली.

या नंतर संचालकांनी सन्माननीय सदस्यांचे त्यांनी बैठकीत दिलेल्या योगदानाबद्दल आभार मानले व बैठकीचे कामकाज संपले.

उमराजदेरकर

( डॉ.उमेश राजदेरकर )
संचालक
मानव्यविद्या व सा.शास्त्रे विद्याशाखा

प्रति
मा. कुलगुरू,

मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा परिषदेच्या इतिवृत्तास मंजुरी द्यावी ही विनंती.

उमराजदेरकर

(डॉ.उमेश राजदेरकर)
संचालक,
मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा

मा. कुलगुरू